सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३५० | शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ सोने ९९.५०% : ₹ १,४९,०००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,३८,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१५,०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३४०/-
भाव प्रती १० ग्राम




**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!

# असंख्य भाविकांनी घेतली परम पवित्र भव्य महारुद्र पूजा पूर्णाहुतीची अनुभूती

## मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे प्रथमच आयोजन : तीन दिवसीय सोहळ्याची 'मंगलमय' वातावरणाने सांगता

## आमदार अनिलदादा पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचीही लाभली उपस्थिती



*अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात राष्ट्रकल्याण, संरक्षण, समृध्दी, लोककल्याण तसेच संस्थेच्या विविध संकल्पपूर्ती निमित्त तीन दिवसीय भव्य महारुद्र अभिषेक पूजा करण्यात आली. बुधवार, दि. ९ सप्टेंबर पासून सुरू झालेल्या तीन दिवसीय धार्मिक सोहळ्याची शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात पूर्णाहुती झाली. पूर्णाहुतीपूर्वी महाआरती करताना आमदार अनिलदादा पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्रीताई पाटील, पूजेचे विशेष यजमान मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले यांच्यासमवेत विविध पक्ष, संस्था, संघटना, समाजांचे अनेक पदाधिकारी व सदस्य व स्थानिक आणि राज्य आणि परराज्यातील उपस्थित भाविक.*

*(सर्व छायाचित्रे : नितेश बारी, रॉकी पवार)*

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजेपासून सुरू झालेल्या श्री मंगळग्रह देवांच्या परम पवित्र तीन दिवसीय भव्य महारुद्र पूजेची आज शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास भक्ती, चैतन्य आणि मंगलमय वातावरणात पूर्णाहुतीने सांगता झाली.**

यावेळी आमदार अनिलदादा पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्रीताई पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व सहाय्यक निरीक्षक शरद काकळीज यांच्यासह आणि समाजातील विविध पक्ष, संस्था, संघटना, समाजांचे अनेक पदाधिकारी, सदस्य, विविध महिला मंडळांच्या पदाधिकारी, सदस्या यांच्यासह असंख्य भाविक उपस्थित होते. प्रधान आचार्य तथा वेदमूर्ती श्री. केशव पुराणिक गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रकल्याण, संरक्षण, समृद्धी तसेच संस्थेच्या विविध संकल्पपूर्तीनिमित्त हा भव्य महारुद्र अभिषेक पूजा सोहळा आयोजित करण्यात आला.


मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले या विशेष धार्मिक सोहळ्याचे यजमान होते. त्यांच्या शुभ हस्ते या तीन दिवसीय परम पवित्र भव्य महारुद्र अभिषेक पूजेचे अनुष्ठान कार्य झाले. आज शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी या भव्य महारुद्र अभिषेक पूजेच्या पूर्णाहुतीपूर्वी सकाळी साडेनऊच्या सुमारास सर्व स्थापित देवतांची पूजा झाली. 'अष्टोत्तरशत लिंगतो भद्र मंडलावर' भगवान महादेवांची व श्री मंगळग्रह देव, भूमिमाता, पंचमुखी हनुमानजी यांनाही आवाहन करत त्यांची स्थापना करण्यात आली. त्यानंतर अरणीमंथन करून अग्नी प्रज्वलित करण्यात आला. नवग्रह रुद्र स्थापन करून त्यांचे हवन झाले. प्रधान देवता श्री मंगळग्रह देव व भगवान महादेव यांच्याप्रीत्यर्थ रुद्राच्या १२१ आवर्तनांनी हवन (अंदाजे २००० आहुत्या) यज्ञात टाकण्यात आल्या. भगवान शंकरांच्या जल्लोषपूर्ण तांडवस्तोत्राने पूर्णाहुतीसाठीची वातावरणनिर्मिती झाली. त्यानंतर विशेष हवन, बलिदान व पूर्णाहुती झाली. पूर्णाहुतीनंतर महाआरती, मंत्रपुष्पांजली झाली. त्यानंतर पुरोहितांनी फडकत्याचालीवर शिवशंकरांचे संगीताच्या साथीने भक्तीगित म्हटले. त्यावर डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले, आमदार अनिलदादा पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सौ. जयश्रीताई पाटील यांच्यासह उपस्थित भाविकांनी नृत्याचा आनंद घेतला. भक्तीमय, चैतन्यमय आणि मंगलमय वातावरणात अतिशय जल्लोषपूर्ण या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली. रात्री उशिरापर्यंत भाविकांनी दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला. सदर तीन दिवसीय परम पवित्र महारुद्र अभिषेक पूजेसाठी वेदमूर्ती व्यंकटेश कळवे गुरुजी, सारंग पाठक, शुभम वैष्णव, प्रसाद भंडारी, परशुराम शर्मा, पवन शर्मा, यश जोशी, चंद्रकांत जोशी, तुषार दीक्षित, जयेंद्र वैद्य, मंदार कुलकर्णी, अक्षय जोशी, वैभव लोकाक्षी, गणेश जोशी, विनोद पाठक, दिव्येश जोशी, शैलेश जोशी, उमेश पंचभाई, निलेश रोडे, हेमंत गोसावी यांच्यासह अयोध्या व प्रयागराज येथून खास निमंत्रित गौरव मिश्रा, सूरज मिश्रा, मनजीत मिश्रा व हरिओम शुक्ल यांनी पौरोहित्य केले. त्यांना उमेश पाठक, प्रवीण भंडारी व चेतन नाईक यांच्यासह मंदिरातील सेवेकऱ्यांनी सहकार्य केले. मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, डी. ए. सोनवणे यांच्यासह मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, व्ही. व्ही. कुलकर्णी, उमाकांत हिरे, बाळा पवार, पुषंद ढाके आदींनी परिश्रम घेतले.





## आमदार अनिलदादांकडून टाळ वादन सेवा

**श्री मंगळग्रह मंदिरात आयोजित तीन दिवसीय परम पवित्र महारुद्र अभिषेक पूजेच्या पूर्णाहुतीपूर्वी दुपारी आमदार अनिलदादा पाटील 'अष्टोत्तरशत लिंगतो भद्र मंडल' स्थानी काही वेळ बसले. यावेळी वाद्यवृंदाच्या साथीत म्हटल्या गेलेल्या श्री मंगळग्रह देव आणि भगवान शंकर यांच्या स्तुतीपर भजनांवर टाळ वादन करीत मंत्रमुग्ध होऊन साथसंगत केली. याप्रसंगी उपस्थित असंख्य भाविकांनीही या स्तुतीपर भजनांचा आत्मानंद घेतला.**



## १३ सप्टेंबरला बाबा रामदेवजींचा जन्मोत्सव

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहराच्या पावनभूमीत कलियुग अवतारी भगवान श्री बाबा रामदेवजी महाराज यांचा जन्मोत्सव रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त श्री पगल्या पूजन व महाभिषेकासह भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री द्वारकाधीश बाबा रामदेवजी भक्त मंडळाच्या वतीने आयोजित या उत्सवात भव्य दरबार, श्री पगल्या पूजन व महाभिषेक, शोभायात्रा, जन्मोत्सव महाआरती तसेच प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या सोहळ्यास पं. पूज्य रामदेवजी शर्मा (बापजी कलमसरा) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी ७.३१ वाजता श्री पगल्या पूजन व महाभिषेक, त्यानंतर ८.३१ वाजता भव्य शोभायात्रेला सुरूवात होणार आहे. सकाळी १० वाजता जन्मोत्सव महाआरती होणार आहे. हा धार्मिक सोहळा श्री महादेवजी मंदिर, भागवत रोड येथे होईल. या पावन सोहळ्याचा लाभ श्रद्धाळू भक्तांनी सहकुटुंब व इष्टमित्रांसह घ्यावा, तसेच शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्री द्वारकाधीश बाबा रामदेवजी भक्त मंडळाने केले आहे.



## संपादकीय

# शेतीवरील आपत्तींचेही व्यवस्थापन हवे!

जवळपास निम्म्यापेक्षा जास्त पावसाळा संपत आला आहे. यावर्षी वेधशाळांनी व्यक्त केलेल्या अंदाजाप्रमाणे पावसाचे प्रमाण कमी आहे. परंतु राज्याच्या अनेक भागांमध्ये वेधशाळांनी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षाही पाऊस कमी झालेला दिसतो. विशेषतः मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पुणे जिल्ह्यातील काही गावं, अहिल्यानगर जिल्हा अशा काही ठिकाणी पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे आतापासूनच दुष्काळ सदृशपरिस्थिती निर्माण झालेली आहे. मराठवाड्यामध्ये तर शेतामध्ये उभी असलेली पिके पावसाळा संपण्याआधीच नाहीशी होत आहेत. अनेक प्रकारचा खर्च करून हाताशी आलेली ही पिके आपल्या डोळ्यादेखत नाहीशी होताना शेतकऱ्याला पाहावी लागत आहेत. दिसताना हे काही ठिकाणी होत जरी असले तरी शेतकरी बांधवांच्या उत्पन्नावर तसेच एकूण शेतमाल उत्पन्नावर त्याचे परिणाम होताना दिसत आहेत. राज्याच्या काही भागात चांगला पाऊस झाला, धरणे पूर्ण भरली. परंतु अशी परिस्थिती जरी असली तरी साधारणपणे श्रावणाचा महिनाभर झिरपणारा पाऊस हा आवश्यक असतो. भाद्रपदामध्ये सुद्धा पावसाचा थोडाफार शिडकावा होणे हे जमिनीत पाणी भरण्यासाठी आवश्यक मानले जाते. परंतु यंदा भाद्रपदात सुरूवातीलाच पावसाने पाठ फिरवलेली दिसत आहे. राज्याच्या इतर भागातही पावसाचे हे रागावणे शेतकऱ्यांवर मोठे संकट आणणारे ठरत आहे. धरणे जरी भरलेली असली तरी त्यातले पाणी टिकवून ठेवणे हे देखील तितकच मोठे आव्हान असते. म्हणूनच भाद्रपदाच्या अखेरीपर्यंत थोडाफार पाऊस होत राहणे आणि जमिनीतली ओल ही पुढचा किमान महिनाभर तरी टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. दुर्दैवाने आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. स्वाभाविकपणे पुढच्या महिन्या-दोन महिन्यातच ज्या ठिकाणी धरणे भरलेली आहेत, तिथे सुद्धा हे पाणी वर्षभर कसे पुरवायचे असा प्रश्न निर्माण होणार आहे.

ज्या भागात ३०-४० टक्के पाऊस कमी झाला आहे, तिथे तर शेतकऱ्यांचे झालेले मोठे नुकसान शिवाय जनावरांच्या वैरणाचादेखील मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. सरकारने या संभाव्य संकटाकडे कितपत लक्ष दिलेले आहे हे कळायला मार्ग नाही. पण जर लक्ष दिले गेले असते, तर ज्या भागात पाऊस तब्बल तीस-चाळीस टक्के कमी झाला आहे त्या भागातल्या नुकसानीचा अंदाज घ्यायला सरकारी यंत्रणांनी सुरुवात केली असती. परंतु ते कामही झालेले नाही. सरकारी कारभार म्हटल्यानंतर तो याच पद्धतीने काम करतो. ज्यावेळेला संकट गळ्याशी येते तेव्हाच सरकारलाही जाग येत असते. आज शेतीच्या नुकसानीबरोबरच पाण्याच्या भीषण टंचाईचा प्रश्न महाराष्ट्रापुढे उभा राहिला आहे. सरकारला असे वाटत असेल की, दरवर्षीप्रमाणे जाता जाता पाऊस सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये सुद्धा येईल आणि त्यातून पाण्याची समस्या सुटेल. परंतु यावर्षीची परिस्थिती पाहिली तर अशा प्रकारची आशा मनात ठेवून फारसे काही हाती लागण्याची शक्यता दिसत नाही. आज महाराष्ट्र पावसाळा संपण्यापूर्वीच पाणी टंचाईच्या उंबरठ्यावर उभा आहे. सरकारने या प्रकाराची गांभीयनि दखल घेतली पाहिजे आणि आतापासूनच उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू केली पाहिजे. आणखी दोन महिन्यांनी 'पाणी वाचवा' अशा प्रकारच्या सरकारच्या जाहिराती सुरू होतील. परंतु त्याला उशीर झालेला असेल. आहे ते पाणी टिकवून ठेवण्यासाठी सुद्धा मोठ्या नवतंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे. सरकारकडून विविध उपाययोजनांची अंमलबजावणी ही पूर्वतयारीनिशी व्हायला हवी. अन्यथा साधारणपणे डिसेंबर-जानेवारीत या धरणांमध्ये किंवा जलाशयांमधले पाणीसुद्धा बाष्पीभवनाच्या माध्यमातून कमी व्हायला लागते. काही ठिकाणी धरणांच्या आसपासच पाण्याचे चर खोदून पाणी टिकवण्याचा प्रयत्न होतो, परंतु ते प्रयत्न फार काही हातभार लावणारे ठरत नाहीत. आपल्या देशात शेती हा प्रमुख उद्योग मानला जातो. महाराष्ट्रही याला काही अपवाद नाही. इथेही शेतीतून अर्थचक्राला गती मिळते, रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतो. अगदी कोरोनासारख्या महामारीच्या संकटातसुद्धा देशातले उद्योग बंद पडले होते आणि रोजगाराचाही प्रश्न निर्माण झाला होता. परंतु शेती हा एकमेव उद्योग असा होता की ज्याने कोरोना काळातसुद्धा अनेकांना रोजगार देण्यात मोठी भूमिका पार पाडली होती.

जर शेती हा उद्योग इतका महत्त्वपूर्ण असेल, तर शेतीवर येणाऱ्या आपत्तीसंबंधात अत्याधुनिक स्वरूपाची व्यवस्थापन यंत्रणा गरजेची ठरते. सरकार वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तींसाठी स्वतंत्र आपत्तीनियोजन करते, त्यासाठी व्यवस्थाही आखल्या जातात आणि कोणतेही संकट निर्माण झाल्याबरोबर तातडीने मदत पोहोचवण्याचा निर्णय घेतला जातो. हे जसे ऐनवेळी उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या बाबतीत केले जाते ज्याला आपदा प्रबंधन किंवा आपत्ती व्यवस्थापन म्हटले जाते. त्याची चौकट ही महापूर, भूकंप, चक्रीवादळ, भूस्खलन यासारख्या आपत्तीपुरतीच मर्यादित राहिलेली आहे. परंतु देशाच्या कुठल्या ना कुठल्या भागांमध्ये शेतीवर येणाऱ्या आपत्ती सुरू असतात. महाराष्ट्रातसुद्धा अतिवृष्टी पासून ते दुष्काळापर्यंतच्या समस्या निर्माण होतात आणि शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला तोंड द्यावे लागते. शेतीवर येणारी आपत्ती ही देखील तितकीच गंभीर स्वरूपाची असल्याने शेतीच्या आपत्तीव्यवस्थापनाचे आधुनिक तंत्रनियोजन करण्याची वेळ आलेली आहे. वेधशाळांनी पाऊस कमी होणार हा अंदाज व्यक्त केलेला होता. त्या कमी होणाऱ्या पावसाचा काय काय परिणाम होईल याचा विचार करणारी यंत्रणा असणे आणि पाऊस कमी झालाच तर कोणकोणत्या प्रकारची मदत करण्याची गरज पडेल याची पूर्वतयारी करून देणारी व्यवस्था आज तितकीच गरजेची झालेली आहे. म्हणूनच आज महाराष्ट्र पुन्हा एकदा दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा असताना शेतीपासून ते पिण्याच्या पाण्यापर्यंतच्या आपत्तीव्यवस्थापनाचे नियोजन आतापासूनच तातडीने सुरू करण्याची गरज आहे.



हवनकुंडात समिधा अर्पित करताना डॉ. महाले व सौ. आशाताई महाले. शेजारी आमदार अनिलदादा पाटील व सौ. जयश्रीताई पाटील आणि भाविक.



पूर्णाहुतीसाठीची वातावरणनिर्मिती म्हणून जल्लोषपूर्ण म्हटल्या गेलेल्या भगवान शंकरांच्या तांडवस्तोत्रावेळी नृत्य करण्यात दंग झालेले भाविक.



पूर्णाहुतीसाठी श्री मंगळग्रह मंदिरासमोरील सभामंडपात स्थापित करण्यात आलेल्या विविध देव-देवतांसह १०८ शिवलिंग आणि त्यांच्याशी संबंधित शिवशक्तींची स्थापना केलेले 'श्री अष्टोत्तरशत लिंगतोभद्र मंडल'.



विधीवत मंत्रोच्चारात हवन करताना डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले.





# आमदार अनिलदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वीजप्रश्नी बैठक

## कृषिपंपांना दिवसा पूर्ण क्षमतेने वीजपुरवठ्यासाठी युद्धपातळीवर उपाय योजण्याची सूचना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर विधानसभा मतदारसंघातील वीज वितरणाशी संबंधित विविध समस्या, विशेषतः कृषिपंपांना दिवसा सुरळीत व पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी आमदार अनिलदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक झाली. बैठकीस महावितरणचे कार्यकारी अभियंता निलेश सोनगिरे (धरणगाव विभाग), ज्ञानेश्वर अंबाडकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अमळनेर शहर उपविभाग), मनोज भावसार (उपकार्यकारी अभियंता, अमळनेर ग्रामीण उपविभाग), अविनाश सूर्यवंशी (सहाय्यक अभियंता, पायाभूत आराखडा, धरणगाव), तसेच सहाय्यक अभियंता चैतन्य वाघ, विनायक बोरसे व अमित चव्हाण उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील विद्यमान वीज वितरण व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. तालुक्यात हल्ली एकूण १४ ठिकाणी ३३ केव्ही उपकेंद्रे कार्यरत आहेत. वाढती वीज मागणी आणि विशेषतः कृषी क्षेत्रातील वाढता भार लक्षात घेता यंत्रणा अधिक सक्षम करण्याचे नियोजन करण्यात आले.

**सहा ठिकाणी अतिरिक्त रोहित्र, कामे प्रगतीपथावर**

तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी ६ उपकेंद्रात नवीन अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर (पीटीएफ) मंजूर करण्यात आले आहेत. यात ३३ केव्ही वावडे, ३३ केव्ही अंतुर्ली, ३३ केव्ही जानवे, ३३ केव्ही कलमसरे, ३३ केव्ही सरबेटे आणि ३३ केव्ही भरवस या उपकेंद्रांचा समावेश आहे. ही सर्व कामे सध्या युद्धपातळीवर सुरू आहेत. नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे संबंधित उपकेंद्रांवरील भाराचे योग्य नियोजन होऊन वीज वितरण क्षमता वाढणार आहे.

**चार कृषी वाहिन्यांसाठी विशेष उपाययोजना**

तालुक्यातील ३३ केव्ही जानवे, सरबेटे, कळमसरे व गांधली या उपकेंद्रांमधून निघणाऱ्या कृषी वाहिन्यांवरील कृषिपंपांना हल्लीच्या वाढत्या भारामुळे दिवसा पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करणे आव्हानात्मक ठरत आहे. ही समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी या चारपैकी तीन उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्स्फॉर्मर बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे कामही नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण होणार आहे. त्यामुळे कृषी वाहिन्यांवरील भाराचे व्यवस्थापन शक्य होणार आहे.

**शिरूड येथे ३३ केव्ही नवीन उपकेंद्र**

वीज वितरण अधिक मजबूत करण्यासाठी ३३ केव्ही शिरूड येथे नवीन उपकेंद्रास मंजुरी देण्यात आली आहे. त्याबाबतचे काम प्रगतीपथावर आहे. हे उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील वीज वितरणावरील भाराचे विभाजन होऊन पुरवठ्याची विश्वासार्हता वाढेल आणि भविष्यातील वाढती कृषी, घरगुती व व्यावसायिक मागणी भागविता येईल.

**कृषी क्षेत्राला दिवसा सक्षम वीजपुरवठ्यावर भर**

बैठकीत शेतकऱ्यांना कृषिपंपांसाठी दिवसा मिळणारा वीजपुरवठा अधिक सक्षम आणि विश्वासार्ह करण्यावर विशेष भर देण्यात आला. त्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी उपकेंद्रांची क्षमता वाढवणे, अतिरिक्त रोहित्र बसवणे, नवीन उपकेंद्रे उभारणे आणि विद्यमान यंत्रणेचे बळकटीकरण या माध्यमातून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व अभियंत्यांना आमदारांकडून देण्यात आल्या आहेत. नोव्हेंबर २०२६ अखेर ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर अमळनेर तालुक्यातील कृषी पंपांना दिवसा अधिक सक्षम व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.



*अमळनेर : अमळनेर विधानसभा मतदारसंघातील वीज वितरणाशी संबंधित विविध समस्यांच्या पार्श्वभुमीवर, शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी झालेली बैठकीत महावितरणचे कार्यकारी अभियंता निलेश सोनगिरे (धरणगाव विभाग), ज्ञानेश्वर अंबाडकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अमळनेर शहर उपविभाग), मनोज भावसार (उपकार्यकारी अभियंता, अमळनेर ग्रामीण उपविभाग), अविनाश सूर्यवंशी (सहाय्यक अभियंता, पायाभूत आराखडा, धरणगाव), तसेच सहाय्यक अभियंता चैतन्य वाघ, विनायक बोरसे व अमित चव्हाण यांच्याशी चर्चा करतांना तथा त्यांना सूचना देताना आमदार अनिलदादा पाटील.*

# कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या शहराध्यक्षपदी प्रवीणकुमार पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पारंपरिक कुस्ती कलेचे जतन व संवर्धन तसेच नवोदित मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत असलेल्या कुस्ती मल्लविद्या महासंघाच्या येथील शहराध्यक्षपदी प्रवीणकुमार शांताराम पाटील यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे कुस्ती क्षेत्रातून स्वागत होत असून, विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अमळनेर शहर व परिसरातील आखाडे, वस्ताद, पैलवान आणि कुस्तीप्रेमींना एका व्यासपीठावर आणून कुस्ती चळवळीला बळ देण्याचा मानस श्री. पाटील यांनी व्यक्त केला. ग्रामीण भागातील होतकरू मल्लांना योग्य मार्गदर्शन, सरावासाठी प्रोत्साहन तसेच विविध कुस्ती स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक सहकार्य मिळवून देण्यावर भर देण्यात येणार आहे. शहरातील कुस्ती स्पर्धांना चालना देणे, पारंपरिक आखाडा संस्कृतीचे जतन करणे आणि गुणवंत व नवोदित मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी आगामी काळात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, कुस्ती मल्लविद्या महासंघाचे पदाधिकारी, पैलवान, वस्ताद, क्रीडा संघटक व कुस्तीप्रेमींनी श्री. पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# एनसीएमसी कार्ड रिचार्ज प्रक्रियेचा प्रवाशांना फटका

## एजंटकडून रिचार्ज केल्यास मोठी रक्कम कपात होत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : बोगस लाभार्थ्यांना आळा घालण्यासोबतच प्रवाशांना रोख रकमेऐवजी सहज आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळावी, या उद्देशाने राज्य परिवहन महामंडळाकडून (एस.टी.) एनसीएमसी कार्डची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, या कार्डच्या रिचार्जवेळी प्रवाशांच्या मागणीप्रमाणे सदर कार्ड रिचार्ज न होता त्यात मोठी रक्कम कपात होऊन ते रिचार्ज होत असल्याने या सुविधेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः खासगी एजंटकडून एनसीएमसी कार्ड रिचार्ज केल्यास मोठी रक्कम कपात होत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. कार्डवर रिचार्ज केलेली पूर्ण रक्कम प्रवासासाठी उपलब्ध व्हायला पाहिजे. मात्र, असे होत नसल्याने रिचार्जच्या नावाखाली नेमकी किती रक्कम कोणत्या कारणासाठी वजा केली जाते, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**कपात नेमकी कशाची?**

एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून प्रवास सुलभ करण्याचा उद्देश असताना रिचार्जच्या रकमेत तफावत का निर्माण होते, याबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम आहे. खासगी एजंटकडून रिचार्ज करताना होणारी कपात ही कोणते शुल्क, सेवा आकार किंवा अन्य कारणामुळे आहे, याची महामंडळाने स्पष्ट माहिती प्रवाशांना द्यावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा सुविधा देण्याच्या नावाखाली प्रवाशांच्याच खिशाला कात्री लागत असल्याची भावना अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

**५० रुपयांमागे कापले जातात १२ रुपये**

एजंटकडून ५० रुपयांचे रिचार्ज केल्यानंतर कार्डवर ३७.६७, तर १०० रुपयांच्या रिचार्जवर ८७.१४ रुपये उपलब्ध होत आहेत. त्याचप्रमाणे २०० रुपयांच्या रिचार्जवर १८६.०८ रुपये, ५०० रुपयांवर ४८२.८९ रुपये आणि १,००० रुपयांच्या रिचार्जवर ९७७.५८ रुपये मिळत आहेत.

**थेट रिचार्जची सुविधा हवी, पूर्ण पैसे मिळावेत**

रेल्वेच्या ॲपप्रमाणे एस.टी. महामंडळाचेही ॲप असावे व प्रवाशाला थेट रिचार्जची सुविधा उपलब्ध करून रिचार्जची पूर्ण रक्कम मिळावी, अशी मागणी होत आहे.

**वाहकाकडून रिचार्जला अल्प कपात**

एस.टी. महामंडळाच्या वाहकाकडून एनसीएमसी कार्ड रिचार्ज केल्यास ५० रुपयांच्या रिचार्जवर ४९.४७ रुपये, १०० रुपयांवर ९८.९४ रुपये, २०० रुपयांवर १९७.८८ रुपये, ५०० रुपयांवर ४२४.७० रुपये आणि १,००० रुपयांवर ९८९.४० रुपये उपलब्ध होत असल्याचे नमूद आहे.




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# गांव से आई जिस लड़की पर हंसते थे, आज है आयएएस अफसर

## बीएआरसी, आयएसआरओ, पीसीएस, एसएससी समेत कई एग्जाम पास

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आप परीक्षा का नाम लीजिए, शायद वो भी सुरभि गौतम ने पास की होगी। जी हां, कभी जिस गांव की लड़की की अंग्रेजी का मजाक बनाया गया था, आज वे न सिर्फ आयएएस ऑफिसर हैं, बल्कि बीएआरसी, आयएसआरओ, पीसीएस, एसएससी दिल्ली पुलिस सब-इंस्पेक्टर, यूपीएससी आयईएस समेत कई एग्जाम्स क्वालीफाई कर चुकी हैं। उन्होंने इंजीनियरिंग के बाद टीसीएस की जॉब छोड़कर सिविल सेवा को चुना था।

'गांव की बेटी कैसे हो, सुरभि गौतम जैसी हो....' नारा लगाते हुए जिस लड़की का गांव में भव्य स्वागत किया गया था, करीब २५ साल पहले उसी लड़की के जन्म पर माता-पिता के अलावा कोई ज्यादा खुश नहीं था। बड़ी जॉइंट फैमिली के लिए वो दिन बाकी दिनों की तरह एक साधारण दिन था। लेकिन उसी लड़की ने अपनी मेहनत, कुछ बनने की चाह और जुनून की वजह से पूरे देश में नाम रोशन किया। आईएएस ऑफिसर सुरभि गौतम की सक्सेस स्टोरी सिखाती है मुश्किलों को भी कामयाबी की सीढ़ी में बदला जा सकता है।

### पिता वकील, मां टीचर

सुरभि गौतम, मध्य प्रदेश के सतना जिले के छोटे से गांव अमदारा के साधारण परिवार से आती हैं। उनका जन्म २१ अगस्त १९९१ को हुआ था। पिता वकील हैं और मां एक टीचर हैं। उनकी स्कूलिंग गांव के सरकारी स्कूल से हुई है। सुरभि गौतम गांव से निकलकर शहर की लाइफ, कॉलेज और फिर UPSC समेत एक के बाद एक कई परीक्षाओं में सफलता के बारे में बात कर चुकी हैं।

### बोर्ड परीक्षा में मैथ्स में १०० प्रतिशत मार्क्स

सुरभि बचपन से पढ़ाई में काफी होशियार रही हैं। बोर्ड परीक्षाओं में फर्स्ट डिवीजन से पास होती थीं। एमपी बोर्ड ५वीं के रिजल्ट में उन्हें मैथ्स में १०० में से १०० नंबर मिले थे। तब उनकी टीचर ने उन्हें बुलाकर काफी तारीफ की थी और भविष्य में एकेडमिक में जाने की सलाह दी थी। शिक्षिका का वही एप्रिसिएशन सुरभि के लिए मोटिवेशन बन गया।

छोटी सी सुरभि को लगा कि प्रशंसा पाने का सिर्फ एक ही रास्ता है हर परीक्षा में अच्छे नंबर लाना। १०वीं और १२वीं बोर्ड परीक्षाओं में भी उन्होंने ९० प्रतिशत से ज्यादा मार्क्स हासिल किए। जिसकी वजह से कॉलेज में आसानी से एडमिशन मिल गया।

गांव से आई लड़की की इंग्लिश का उड़ाते थे मजाकगांव के हिंदी मीडियम स्कूल से पढ़ी सुरभि जब शहर के बड़े कॉलेज पहुंची, तो अंग्रेजी उनकी सबसे बड़ी कमजोरी बन गई। कॉलेज के पहले दिन जब उनसे अंग्रेजी में इंट्रोडक्शन मांगा गया, तो वे सही से नहीं बोल पाई और स्टूडेंट्स ने उनकी इंग्लिश का मजाक बनाया। यहां तक कि टीचर ने भी उनकी योग्यता पर सवाल उठाए।



उस समय सुरभि ने आंसू बहाने के बजाय इस कमजोरी को दूर करने का फैसला लिया। वे रोजाना अंग्रेजी के १० नए शब्द सीखती थीं, दीवार के सामने और खुद से शीशे के सामने खड़ी होकर बात करती थीं। लगातार प्रैक्टिस से अंग्रेजी भाषा पर उनकी पकड़ जल्द ही अच्छी हो गई।

इंजीनियरिंग के बाद यूपीएससी के लिए छोड़ी टीसीएस की जॉबसुरभि गौतम ने मध्य प्रदेश के प्रतिष्ठित इंजीनियरिंग कॉलेज राजीव गांधी टेक्निकल यूनिवर्सिटी (आरजीपीव्ही), भोपाल से इलेक्ट्रॉनिक्स और कम्युनिकेशन में बी.ई की डिग्री हासिल की है। उन्हें अपने कॉलेज में टॉपर थीं और चांसलर अवॉर्ड से भी सम्मानित किया गया था।

अच्छे एकेडमिक स्कोर के चलते इंजीनियरिंग के बाद आईटी कंपनी टीसीएस में अच्छी सैलरी वाली जॉब मिल गई। लेकिन सुरभि ने यूपीएससी के लिए जॉब छोड़ने का फैसला लिया। उनका सपना सिविल सेवा में जाने का था।

बीएआरसी, आयएसआरओ, पीसीएस, एसएससी समेत कई परीक्षाएं क्लियर कींपढ़ाई में होनहार के सामने जो भी परीक्षा आई, वे उसे पास करती गईं। साल २०१३ में यूपीएससी की इंजीनियरिंग सेवा परीक्षा में एआयआर-१ हासिल की। इसके बाद एमपीपीएससी, पीसीएस, आयएसआरओ, भाभा परमाणु अनुसंधान केंद्र (बीएआरसी) में साइंटिस्ट की परीक्षा, जीएटीई, एसएआयएल, एसएससी सीजीएल, दिल्ली पुलिस दारोगा (एसआय) और एफसीआय जैसी कई प्रतियोगी परीक्षाएं शामिल हैं, जिन्हें सुरभि गौतम ने क्वालीफाई किया है।

### यूपीएससी सीएसई में ५०वीं रैंक लाकर बनीं आयएएस ऑफिसर

पहले देखा था। यूपीएससी सिविल सेवा परीक्षा २०१६ में वो भी पूरा हो गया। उन्होंने इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग को ऑप्शनल सब्जेक्ट के तौर पर चुना और इंग्लिश मीडियम से यूपीएससी सीएसई एग्जाम दिया। २०१६ की यूपीएससी परीक्षा में ५०वीं ऑल इंडिया रैंक (यूपीएससी एआयआर) हासिल करके आईएएस ऑफिसर के रूप में चयनित हुईं। बता दें कि वर्तमान में आईएएस ऑफिसर सुरभि गौतम गुजरात के दाहोद जिले में कलेक्टर और जिला मजिस्ट्रेट के पद पर कार्यरत हैं।



# वॉटर टाईम बॉम्बवर वसवले गेलेले आजचे नाशिक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एखादी सामान्य दिसणारी नदी किती प्रलयंकारी असू शकते हे नेपाळच्या दुर्घटनेमध्ये दिसून आले आणि अजूनही तो धोका टाळलेला नाही. येथे नाशकात जिथे एक वर्षात मोठा कुंभमेळा भरणार आहे तेथे पाच नद्यांना दाबून टाकून त्यांच्यावर वस्त्या उभ्या राहिलेल्या आहेत. जेव्हा नाशिक आणि नदीच्या कॅचमेंट एरियामध्येमध्ये काही मिली मीटर जास्त पाऊस होतो त्यावेळी काय होऊ शकते हे गोदावरी आणि नंदिनीसारख्या नद्यांनी दाखवून दिलेले आहे.

गोदावरीत सामील होणाऱ्या नाशिक शहरातील मुस्कटदाबी झालेल्या नद्या खालीलप्रमाणे आहेत.

१) गोदावरी (मुख्य प्रवाही नदी)
२) अरुणा (गुप्त नदी)
३) वरुणा (गुप्त नदी)
४) तरुणी (पौराणिक उल्लेख असलेली गुप्त धारा)
५) इंद्रायणी इंद्र कुंडातून रामकुंडाकडे येणारी नदी. हिच्या सर्वपात्रावर मोठमोठ्या इमारती उभ्या केल्या गेलेल्या आहेत. आणि त्यांच्या खालून ही नदी सुप्त बॉम्ब सारखी वाहते. हिचा कधीही विस्फोट होऊ शकतो.
६) कपिला (तपोवन परिसरात गोदावरीला मिळणारी उपनदी)

वरील तीन नद्या म्हणजे अरुणा तरुणा आणि कपिला यांची उगमस्थानेच वादामध्ये आहेत आणि या नद्यांच्या पात्रांमध्ये आज पंचवटी परिसरात भरगच्च वस्त्या उभ्या आहेत. या वस्त्यांना हे देखील माहित नाही की त्यांच्या खालून पाण्याचा प्रचंड मोठा स्त्रोत वाहतो आहे आणि तो कधीही टाईम बॉम्ब लावल्यासारखा फुटू शकतो.

७) सरस्वती या नदीला नाला करून टाकून तिच्यावर सारडा सर्कल, भद्रकाली मार्केट, सराफ बाजार ते गंगेवरील बालाजी मंदिर एवढी सगळी बेकायदेशीर वस्ती वसवली गेली आहे आणि या वस्तीच्या खालून ही नदी टाईम बॉम्ब लावल्यासारखी वाहत आहे.
८) व्याघ्रवती (वाघाडी) या नदीवर म्हसरूळ ते पंचवटी एवढ्या मोठा परिसरात अगदी हातभट्ट्या दारूचे कारखाने वसवले गेलेले आहेत आणि ही नदी मुस्कटदाबी केल्यासारखी या सगळ्या भयानक वस्तीतून जमिनीखालून वाहते.
९) नंदिनी- (नासर्डी) सातपूर परिसरातून पंचवटी तपोवन पर्यंत येणारी ही नदी २० किलोमीटर च्या पात्रामध्ये अगदी गटारगंगा करून सोडलेली आहे आणि तिच्या पात्रावर बेकायदेशीर बांधकामेही करून ठेवली गेलेली आहेत.
१०) काचित- (वालदेवी) त्र्यंबकेश्वरच्या अंजनेरी पर्वतरांगातून पुढे येणारी ही नदी पांडवलेणी, देवळाली, नाशिक रोड असा प्रवास करत पुढे गोदावरीत मिळते याही नदीवर अशीच बेकायदेशीर बांधकामे करून ठेवली गेलेली आहेत आणि गटारेही सोडलेली आहेत.
११) लक्ष्मणा- पंचवटी परिसरातून गोदावरीत जाणारी ही नदी जवळजवळ नष्ट करून टाकली गेलेली आहे आणि त्यावर म्हसरूळ ते मेरी हे सर्व बांधकाम उभे झालेले आहे. भूकंप किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात ही नदी अचानक उफाळून वर आल्यास म्हसरूळ ते पंचवटी हा सर्व परिसर क्षणार्धात नष्ट होऊ शकतो.

यासारखे बावीस प्रवाह नाशिक नगरीत सुप्त अवस्थेत असून ते पुढच्या काळात वाढून ठेवलेल्या आपत्तीची वाट बघत मोठा अनर्थ घडवण्यासाठी सज्ज आहेत. नाशिक नगरीत कुंभमेळा होऊ घातलेला आहे परंतु त्याच्यात या प्रवाहांचा कोठेही विचार केला गेलेला नाही. नाशिकमध्ये १०० मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्यास हे सर्व सुप्त प्रवाह त्यांच्या विनाशक ताकतीसह मोठा अनर्थ घडवल्याशिवाय राहणार नाहीत याची प्रशासनाला आणि नाशिककरांना सुतराम कल्पना नाही. जर विनाशकारी आपत्ती आली तर नाशकात कमीत कमी पाच लाखापेक्षा जास्त जीवितहानी होऊ शकते याची कल्पना राज्य आणि केंद्र प्रशासनालाही नाही.

**नाशिकमध्ये वाहणाऱ्या मुख्य नद्यांची पौराणिक नावे खालीलप्रमाणे**

**१) गंगा गोदावरी**
**२) लक्ष्मणा**
**३) वितस्ता**
**४) अस्किनी**
**५) परुष्णी**
**६) विपाशा**
**७) शततुद्री / शतद्रू**
**८) सदानिरा**
**९) दृषद्वती**
**१०) कुभा**
**११) कुभू**
**१२) गोमती**
**१३) सुवास्तु**
**१४) सरस्वती**
**१५) अरुणा**
**१६) वरुणा**
**१७) तरुणी**
**१८) इंद्रायणी**
**१९) कपिला**
**२०) व्याघ्रवती**
**२१) काचीत**
**२२) नंदिनी**

वरील नद्यांपैकी किती नद्या तुम्हाला माहित आहेत हे नाशिककरांनी आपल्या हृदयावर हात ठेवून सत्य कथन करावे.

# शंभरीपार आयुष्य जगण्याचे रहस्य काय?

## जपानी संशोधकांना मिळाला पेशींमधील महत्त्वाचा पुरावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



काही व्यक्ती १०० वर्षांपेक्षा जास्त कालावधीचे दीर्घायुष्य अगदी सहज कसे जगतात? याचे महत्त्वाचे रहस्य जपानमधील संशोधकांनी उलगडले आहे. १०० वर्षे किंवा त्याहून अधिक आयुष्य जगणाऱ्या व्यक्तींमध्ये एका विशिष्ट आणि दुर्मिळ प्रकारच्या रोगप्रतिकारक पेशींचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे संशोधनात समोर आले आहे.

### काय आहे नवे संशोधन?

जपानच्या ओसाका युनिव्हर्सिटीतील संशोधकांनी केलेल्या या अभ्यासाचे निष्कर्ष 'सेल रिपोर्ट्स' या प्रसिद्ध मासिकात प्रकाशित झाले आहेत. शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीचा भाग असलेल्या 'सीडी४ सीटीएलएस' नावाच्या पांढऱ्या रक्तपेशी १०० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्या व्यक्तींमध्ये लक्षणीयरीत्या वाढतात. तरुण व्यक्तींच्या शरीरात या टी-पेशींचे प्रमाण ५ टक्क्यांपेक्षा कमी असते. मात्र, ११० वर्षे किंवा त्याहून अधिक आयुष्य जगलेल्या अति-दीर्घायुषी व्यक्तींमध्ये हे प्रमाण सरासरी १७.६ टक्के इतके आढळले.

### वयानुसार पेशींमध्ये होणारा बदल

संशोधकांनी ७० ते ९९, १०० ते १०९ आणि ११० वर्षांहून अधिक अशा तीन वयोगटांतील २८ व्यक्तींच्या रक्ताच्या नमुन्यांचे विश्लेषण केले. त्यात वयानुसार या पेशींची टक्केवारी अनुक्रमे ४ टक्के, ९.६ टक्के आणि १७.६ टक्के अशी वाढल्याचे स्पष्ट झाले. वयोमानानुसार शरीरातील इतर अवयव क्षीण होत असताना या पेशी मात्र वाढत्या वयाशी जुळवून घेतात आणि आक्रमकपणे कार्य करतात, असे संशोधनात स्पष्ट झाले.

### निरोगी दीर्घायुष्याचे मॉडेल

अति-दीर्घायुषी व्यक्ती कर्करोग किंवा हृदयविकारासारख्या गंभीर आजारांना दूर ठेवून निरोगी आयुष्य जगतात. या पेशी शरीरात साचणाऱ्या जुन्या खराब पेशींना नष्ट करतात आणि ट्युमरविरुद्ध (गाठी) लढा देऊन कर्करोगाचा धोका टाळण्यास मदत करतात. "दीर्घायुषी व्यक्तींमध्ये या पेशींचा झालेला हा विशेष विस्तार दर्शवतो, की अत्यंत वृद्धापकाळातही मानवी रोगप्रतिकार प्रणाली वाढत्या वयाच्या आव्हानांशी जुळवून घेऊ शकते, असे प्रमुख संशोधक डॉ. कोसुके हाशिमोतो यांनी म्हटले आहे. तथापि, केवळ या पेशींच्या अधिक प्रमाणामुळेच आयुष्य वाढते का, याचे अंतिम पुरावे मिळण्यासाठी या पेशी मानवी उतींमध्ये (टिश्यू) कशाप्रकारे काम करतात, याचा पुढील अभ्यास आता केला जाणार आहे.

# चंदनाचे आरोग्यदायी फायदे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेक कार्यांत चंदनाचा वापर केला जातो. याशिवाय चंदनाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. चंदनामुळे शरीराला थंडावा मिळतो. साबण, कॉस्मेटिक, परफ्यूम, अगरबत्तीसाठी त्याचा वापर होतो. चंदनाचे तेल व पावडर बाजारात मिळते. कमी प्रमाणात भाजल्यास अथवा चटका लागल्यास चंदन तुपात मिसळून लावावे. दाह कमी होतो. चंदन पावडर पाण्यात मिसळून आंघोळ केल्यास शरीर ताजेतवाने होते. शरीराला खाज येत असल्यास अथवा त्वचे संबंधित तक्रार असल्यास चंदन अत्यंत गुणकारी ठरते. चेहरा काळवंडला असेल तर चंदनाचा लेप त्वचेवर लावावा. त्वचा मुलायम आणि तजेलदार होण्यास चंदन अत्यंत गुणकारी आहे. चेहऱ्यावर मुरूम असल्यास गुलाब पाण्यात चंदन मिसळून लेप लावा. शरीरातील स्नायू दुखत असल्यास चंदनाच्या तेलाने मालिश करावी.

# ना मोठा स्टार, ना प्रमोशनचा गाजावाजा!

## दोन कोटींच्या या चित्रपटाने चौथ्या आठवड्यात बॉक्स ऑफिस हादरवले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




कमी बजेट, कमी प्रमोशन आणि सुरूवातीला अत्यल्प कमाई असतानाही प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद एखाद्या चित्रपटाचे नशीब कसे बदलू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. बॉक्स ऑफिसवर एखादा चित्रपट कधी आणि कसा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतो, याचा अंदाज बांधणे अनेकदा कठीण असते. याचाच प्रत्यय सध्या 'हनुमान अंश' या चित्रपटाच्या कमाईवरून येत आहे. कोणताही मोठा गाजावाजा किंवा तगडी प्रमोशनल मोहीम नसताना प्रदर्शित झालेल्या या आध्यात्मिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अनपेक्षितपणे जोरदार कमबॅक केला आहे.

नीम करोली बाबा यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाला सुरूवातीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, तिसऱ्या आठवड्यापासून चित्रपटाच्या कमाईने अचानक वेग घेतला. 'हनुमान अंश' हा चित्रपट दिग्दर्शक विशाल चतुर्वेदी यांनी लिहिला आणि दिग्दर्शित केला आहे. हा चित्रपट प्रसिद्ध आध्यात्मिक संत नीम करोली बाबा, ज्यांना महाराजजी म्हणूनही ओळखलं जातं, यांच्या जीवन आणि आध्यात्मिक प्रवासावर आधारित आहे.

अवघ्या दोन कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट कोणत्याही मार्केटिंगशिवाय थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. 'हनुमान अंश'ने तिसऱ्या आठवड्यात वेग पकडला आणि २०२६ या वर्षातील बॉक्स ऑफिस हिट चित्रपटांपैकी एक बनला. हा चित्रपट ७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित झाला आणि पहिल्या दिवशी फक्त १० लाख रुपयांची कमाई केली. पहिल्या दोन आठवड्यात या चित्रपटाने फक्त १.४८ कोटी रुपये कमावले.

तिसऱ्या आठवड्यात या चित्रपटाची लोकप्रियता आणखी वाढू लागली. प्रेक्षकांनी सोशल मीडियावर त्यांचे अनुभव शेअर केल्यामुळे अधिक लोक या चित्रपटाकडे आकर्षित झाले. तिसऱ्या आठवड्यात १० कोटी रुपयांहून अधिक कमाई झाली. त्यानंतर चौथ्या आठवड्यात त्याहूनही मोठा बदल दिसून आला. चौथ्या शुक्रवारी 'हनुमान अंश'ने ६.२५ कोटी रुपये कमावले आहेत. चौथ्या शनिवारी चित्रपटाच्या कमाईत तब्बल ४८.३७ टयांची वाढ झाली आणि एकाच दिवसात ९.२५ कोटी रुपये कमावले.

चौथ्या शनिवारी या चित्रपटाने १०.७४ कोटी रुपये कमावले आहेत. यामुळे चित्रपटाची एकूण कमाई ३८.१२ कोटी रुपये झाली आहे. विशेष म्हणजे, मोठ्या स्टार्सच्या आणि बिग बजेट चित्रपटांच्या स्पर्धेतही 'हनुमान अंश'ने आपली जागा निर्माण केली आहे. 'टॉक्सिक'सारख्या मोठ्या चित्रपटाच्या रिलीजदरम्यानही या सिनेमाची कमाई टिकून राहिली.

प्रत्येक मुलं मेरीटचा विद्यार्थी आहे.
गरज आहे फक्त Skill Development करण्याची

अमळनेर शहरात पहिल्यांदाच....
१००% गॅरंटी
शिक्षण क्षेत्रातील क्रांतीकारी शोध-पुणे प्रस्तुत

* आपल्या मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नाही का?
* सायन्स, मॅथस् इ. विषय कठीण वाटतात का ?
* भरपूर अभ्यास करुन मार्क्स मिळत नाही का?
* अभ्यासाचा व लिहिण्याचा कंटाळा वाटतो का ?

CBSE माध्यम, इंग्रजी माध्यम, मराठी माध्यम, सर्व विद्यार्थ्यांसाठी

महाराष्ट्रातील ५ लाख विद्यार्थ्यांना हस्ताक्षर व अभ्यासतंत्र शिकविणारी कार्यशाळा
आजपासून कार्यशाळेच्या नविन बॅच सुरु....
फक्त १० तासाचा कोर्स...

Short Term Course
Long Life Benefit

बुध्दी, कला, कौशल्य वाढीसाठी कार्यशाळा

सुंदर अक्षर कार्यशाळा : इंग्रजी मराठी, कर्स्यू, हिंदी हस्ताक्षर सुंदर करा. अक्षर कितीही खराब असो. सुधारण्याची १००% हमी
ब्रेन मॅपिंग ॲण्ड मेमरी डेव्हलप वर्कशॉप : वाचनाची गती वाढवा, कमी वेळात थिअरीचे कन्सेप्ट क्लिअर करुन अभ्यास कायम लक्षात ठेवा.
मॅथस् कॉन्सन्ट्रेशन वर्कशॉप : एक ते दोन वाचनात मॅथस् /भुमिती व सायन्सचे गणित लक्षात ठेवा.
युनिक टेबल मेथड वर्कशॉप : १ ते १००० पर्यंत टेबल २० सेकंदात तयार करा.
स्केअर व क्युब मेथड : १ ते ९९ पर्यंत स्केअर आणि क्युब २० सेकंदात तयार करा.

* कार्यशाळेची वेळ *
सकाळी ८ ते सायं. ८ पर्यंत
* प्रशिक्षण कालावधी *
१ तास प्रमाणे १० दिवस
२ तास प्रमाणे ५ दिवस

* कार्यशाळा पत्ता *
अन्नपूर्णा मंगल कार्यालय, सानेगुरुजी शाळेमागे, पटवारी कॉलनी, अमळनेर (जि. जळगांव)
संपर्क - ९५७९७१२७४३

टिप : १) कार्यशाळा मर्यादित दिवसच आहे. रोज प्रवेश सुरु आहे. २) आपले मुलं भरपूर प्रयत्न करुन ही मागे का ? याचे कारण व समस्त जाणून घेण्यासाठी पालकांनी एकदा तरी कार्यशाळेत प्रत्यक्ष भेट द्या.




# मध्य प्रदेश के मुरैना जिले के ऐंती गांव में स्थित शनिचरा मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शनिदेव को समर्पित एक प्रसिद्ध और प्राचीन तीर्थस्थल है। यहां स्थित शनि पर्वत और शनिदेव के पवित्र विग्रह से जुड़ी अनेक पौराणिक मान्यताएं आज भी श्रद्धालुओं की आस्था का केंद्र हैं।

### पौराणिक मान्यता

स्थानीय धार्मिक परंपरा के अनुसार त्रेतायुग में लंकापति रावण ने शनिदेव सहित कई ग्रहों को अपने नियंत्रण में रखा था। जब हनुमान जी माता सीता की खोज में लंका पहुंचे, तब उन्होंने शनिदेव को बंधन में देखा। शनिदेव ने हनुमान जी से मुक्ति दिलाने की प्रार्थना की। मान्यता है कि हनुमान जी ने शनिदेव को बंधन से मुक्त कराया। लंबे समय तक कैद में रहने के कारण शनिदेव अत्यंत दुर्बल हो चुके थे। कथा के अनुसार, उनकी इच्छा पर



हनुमान जी ने उन्हें लंका से दूर भारत की ओर भेज दिया और वे जिस स्थान पर आकर विराजमान हुए, वही स्थान आगे चलकर शनि पर्वत के नाम से प्रसिद्ध हुआ।

### शनिदेव के विग्रह की मान्यता

स्थानीय मान्यता के अनुसार यहां शनिदेव का पवित्र पिण्ड आकाश से गिरे एक विशाल पाषाण/उल्कापिंड से जुड़ा हुआ माना जाता है। यही कारण है कि इस स्थान को श्रद्धालु अत्यंत दिव्य और सिद्ध स्थल के रूप में देखते हैं।

### इतिहास से जुड़ी परंपरा

मंदिर के संबंध में एक प्रचलित मान्यता यह भी है कि प्राचीन काल में महाराजा विक्रमादित्य ने यहां शनिदेव की पूजा-स्थापना कराई थी तथा उनके सामने हनुमान जी की प्रतिमा स्थापित की थी। बाद के समय में ग्वालियर के सिंधिया शासक दौलतराव सिंधिया द्वारा वर्ष १८०८ ई. में मंदिर का जीर्णोद्धार कराए जाने की बात भी स्थानीय इतिहास में मिलती है।

### मंदिर की प्रमुख मान्यताएं

श्रद्धालु शनिदेव को सरसों का तेल अर्पित करते हैं। यहां शनिदेव के विग्रह का आलिंगन करने की परंपरा भी बताई जाती है। भक्तों की मान्यता है कि इससे जीवन के कष्ट और परेशानियां दूर होती हैं। शनि पर्वत की परिक्रमा को विशेष पुण्यदायी माना जाता है। कई श्रद्धालु अपनी पुरानी वस्तुएं, वस्त्र या जूते-चप्पल छोड़कर यह भावना रखते हैं कि उनके जीवन की परेशानियां भी यहीं छूट जाएं। मंदिर परिसर में स्थित प्राचीन जलधारा को भी श्रद्धालु पवित्र मानते हैं। शनिवार के दिन यहां विशेष भीड़ रहती है, जबकि शनिश्चरी अमावस्या के अवसर पर दूर-दूर से बड़ी संख्या में श्रद्धालु शनिदेव के दर्शन, पूजा और प्रार्थना के लिए पहुंचते हैं।

**जय शनिदेव महाराज!**

# 'या' तीन लोकांची संगत म्हणजे बरबादी

## कधीच यशस्वी होणार नाही, चाणक्यांनी दिला सल्ला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आचार्य चाणक्य यांच्या मते इतरांशी अनावश्यक वाद घालणे टाळले पाहिजे. अनेकदा लोक विविध विषयांवर आपल्या आसपासच्या लोकांना पटवून देण्याचा किंवा त्यांच्याशी युक्तिवाद करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, 'चाणक्य नीती'नुसार, विशिष्ट प्रकारच्या व्यक्तींना पटवून देण्याचा किंवा त्यांच्याशी वाद घालण्याचा प्रयत्न करणे म्हणजे केवळ वेळेचा अपव्यय आणि मूर्खपणा मानला जातो. अशा लोकांशी वाद घातल्याने किंवा त्यांना समजावण्याचा प्रयत्न केल्याने आपली मानसिक शांतता आणि ऊर्जा वाया जाते.

हट्टी आणि मूर्ख लोक


हट्टी आणि मूर्ख लोकांना समजावण्याचा प्रयत्न करणे हीच मुळात एक मूर्खपणाची कृती आहे. ते सुधारतील या आशेने जर तुम्ही त्यांच्या चुका त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या, तर त्यांना ते मुळात समजणारच नाही. यात केवळ तुमचा वेळ वाया जाईल आणि तुमचा स्वतःचाच मूड खराब होईल. म्हणूनच, अशी चूक करणे टाळले पाहिजे.

नकारात्मक विचारांच्या लोकांपासून दूर राहा

असे अनेक लोक असतात जे प्रत्येक गोष्टीबद्दल तक्रार करत असतात किंवा कुरकूर करत असतात. अशा नकारात्मक वृत्तीच्या लोकांपासून तुम्ही दूर राहिले पाहिजे. त्यांना तर्कसंगत गोष्टी पटवून देण्याचा किंवा त्यांच्याशी वाद घालण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. त्यांच्याशी संवाद साधल्याने तुमच्याही मनात नकारात्मक विचार येऊ शकतात. ते सहसा इतरांचा दृष्टिकोन स्वीकारत नाहीत; त्यामुळे त्यांच्याशी वाद घालणे किंवा त्यांना गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे म्हणजे केवळ तुमचा वेळ वाया घालवणे होय. अशा लोकांच्या सहवासामुळे तुमच्या आयुष्यात नवीन समस्या निर्माण होऊ शकतात.

कपटी आणि विश्वासघातकी लोक


जर तुमच्या आसपास एखादी कपटी किंवा विश्वासघातकी व्यक्ती असेल, तर त्यांना समजावण्याचा किंवा त्यांच्याशी तर्काने चर्चा करण्याचा प्रयत्न टाळावा. अशा व्यक्ती स्वभावाने दुष्ट आणि स्वार्थी असतात; त्या केवळ स्वतःच्या हिताचाच विचार करतात. त्यांना एखादी गोष्ट समजावून सांगणे किंवा कोणत्याही कामाबाबत सल्ला देणे म्हणजे केवळ तुमचा वेळ वाया घालवणे होय. त्यांना तुमचा दृष्टिकोन समजत नाही; उलट, ते तुम्हालाच आपला शत्रू मानू लागतात.



इतरांचे मन वळवण्याचा प्रयत्न करून आपली ऊर्जा वाया घालवू नये. जर समोरची व्यक्ती समजून घेण्यास तयार नसेल, तर त्यांच्याशी वाद घालण्यापेक्षा स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करणे अधिक चांगले असते. ज्या व्यक्तीला तुमचा दृष्टिकोन ऐकून घेण्याची, समजून घेण्याची आणि स्वीकारण्याची तयारी असेल, अशाच व्यक्तीशी विषयांवर चर्चा करावी. आचार्य चाणक्य यांच्या मते, या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

# दशदिशांनी लक्ष्मी धावून येणार! ३० वर्षांनतर शनी महाराज होणार मार्गी

## २०२७ पर्यंत 'या' राशी होतील गडगंज श्रीमंत; बँक बॅलन्सही कोटींमध्ये वाढणार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तब्बल ३० वर्षांनंतर शनीदेव मीन राशीत प्रवेश करतील. त्यानंतर शनी ३ जून २०२७ पर्यंत मार्गी होईल. या बदलाचा परिणाम अनेक राशींच्या करिअर, व्यवसाय, उत्पन्न आणि आर्थिक बाबींमध्ये दिसून येऊ शकतो. ११ डिसेंबर रोजी शनीचे गोचर होणार आहे. म्हणजेच या दिवशी शनीची सिद्धी सुरू होईल. ३० वर्षांनंतर शनीदेव मीन राशीत प्रवेश करतील, त्यानंतर शनी ३ जून २०२७ पर्यंत मार्गी होईल. या बदलाचा परिणाम अनेक राशींच्या करिअर, व्यवसाय, उत्पन्न आणि आर्थिक बाबींमध्ये दिसून येऊ शकतो. वृषभ, मिथुन, तूळ आणि मकर राशींसाठी हे विशेषतः शुभ मानले जाते. चला जाणून घेऊया की मंगळ-शनीचा कोणत्या राशींना फायदा होईल.

**वृषभ :** शनीचे गोचर वृषभ राशीच्या लोकांसाठी फायदेशीर मानले जाते. मीन राशीतील शनी तुमच्या राशीपासून ११ व्या घरात गोचर करेल. हे घर उत्पन्न, नफा आणि इच्छापूर्तीशी संबंधित मानले जाते. शनीच्या मार्गी प्रवासानंतर उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळण्याचे संकेत आहेत. व्यावसायिकांना विस्ताराची संधी मिळू शकते. नोकरदार लोकांच्या जबाबदाऱ्या वाढू शकतात. पूर्वीच्या तुलनेत आर्थिक परिस्थितीतही सुधारणा होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** शनीचे गोचर मिथुन राशीच्या लोकांसाठीही सकारात्मक ठरू शकते. शनी तुमच्या दहाव्या घरातून मीन राशीत गोचर करेल. हे घर करिअर आणि व्यवसायाशी संबंधित मानले जाते. ११ डिसेंबरनंतर, नोकरीच्या व्यवसायात लक्षणीय बदल दिसून येऊ शकतो. जे लोक आपले करिअर बदलण्याचा विचार करत आहेत, त्यांच्यासाठी यशाची चिन्हे आहेत. आर्थिक परिस्थितीतही सुधारणा होऊ शकते.

**तूळ :** या राशीच्या लोकांसाठी शनीचे मार्गी गोचर आर्थिक आणि करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकते. मीन राशीतील शनी तुमच्या सहाव्या घरावर परिणाम करेल. ज्योतिषशास्त्रानुसार, सहावे घर नोकरी, कर्ज, शत्रू आणि स्पर्धेशी संबंधित मानले जाते. या काळात आर्थिक परिस्थिती मजबूत होण्याची चिन्हे आहेत. परिस्थितीनुसार प्रगतीच्या संधीही उपलब्ध होऊ शकतात.

**मकर :** या राशीचा स्वामी स्वतः शनी मानला जातो. त्यामुळे शनीच्या भ्रमणातील बदल या राशीसाठी विशेष मानला जातो. शनी तुमच्या तिसऱ्या घरातून मीन राशीत गोचर करेल. हे कार्यक्षेत्रातील धैर्य, पराक्रम, संवाद कौशल्य आणि सामर्थ्य दर्शवते. नोकरदार लोकांना लक्षणीय बदल अनुभवायला मिळू शकतात. व्यवसायाला आणि उद्योजकांना नवीन व उत्तम सौदे मिळण्याची शक्यताही दिसून आली आहे.

# शनीचे महासंक्रमण! 'या' ५ राशींच्या आयुष्यात येणार सुवर्णकाळ


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषाचार्य नरेंद्र उपाध्याय यांच्या मते शनीचा बुधाच्या रेवती नक्षत्रातील प्रवास जवळपास पाच राशींसाठी सकारात्मक परिणाम देऊ शकतो. मात्र, हे परिणाम प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार वेगळे असू शकतात.

ज्योतिषशास्त्रात शनीला कर्म आणि न्यायाचा ग्रह मानले जाते. त्यामुळे शनीच्या राशी किंवा नक्षत्रातील बदलाकडे ज्योतिषप्रेमींचे विशेष लक्ष असते. सध्या शनी मीन राशीत असून, रेवती नक्षत्रातून त्याचा प्रवास सुरू आहे. रेवती नक्षत्राचा स्वामी बुध आहे. ज्योतिषीय गणनेनुसार ९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत शनी याच नक्षत्रात राहणार आहे. त्यामुळे काही राशींसाठी हा काळ आर्थिक आणि व्यावसायिकदृष्ट्या चांगला ठरू शकतो.

ज्योतिषाचार्य नरेंद्र उपाध्याय यांच्या मते शनीचा बुधाच्या रेवती नक्षत्रातील प्रवास जवळपास पाच राशींसाठी सकारात्मक परिणाम देऊ शकतो. मात्र, हे परिणाम प्रत्येक व्यक्तीच्या कुंडलीनुसार वेगळे असू शकतात.

### नोकरी आणि व्यवसायात प्रचंड यशाचा योग



**मिथुन :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ पैशांच्या बाबतीत फायदेशीर ठरू शकतो. उत्पन्नाचे नवीन मार्ग मिळण्याची शक्यता आहे. व्यवसाय करणाऱ्यांना चांगला नफा मिळू शकतो.

**तूळ :** या राशीच्या जातकांसाठीही हा काळ अनुकूल मानला जात आहे. विशेषतः व्यापार करणाऱ्यांना नवीन संधी मिळू शकतात. रखडलेली व्यावसायिक कामं पुढे सरकण्याची शक्यता आहे.

**कन्या :** या राशीच्या लोकांना व्यवसायात एखादी चांगली डील मिळू शकते. कामाच्या ठिकाणी नवीन संधी मिळण्याचे संकेत आहेत. मात्र, आरोग्याची काळजी घेणे आणि पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे ठरेल.

**वृषभ :** या राशीसाठी शनीचा हा नक्षत्र बदल शुभ ठरू शकतो. जमीन किंवा घराशी संबंधित गुंतवणुकीसाठी काळ चांगला असल्याचं ज्योतिषीय मत आहे. आर्थिक नियोजन केल्यास भविष्यात फायदा होऊ शकतो.

**मकर :** या राशीच्या जातकांची आर्थिक बाजू मजबूत होण्याची शक्यता आहे. उत्पन्न आणि बचतीबाबत सकारात्मक बदल दिसू शकतात. त्याचबरोबर विवाहाच्या मार्गातील अडथळेही कमी होण्याचे संकेत ज्योतिषीय गणनेत दिले जात आहेत. एकंदरीत शनीचा रेवती नक्षत्रातील प्रवास या पाच राशींसाठी आशादायी मानला जात आहे. मात्र, कोणताही ज्योतिषीय अंदाज हा निश्चित भविष्यवाणी नसून व्यक्तीच्या संपूर्ण कुंडलीनुसार परिणाम बदलू शकतात.

# खुलताबादच्या भद्रा मारुती मंदिराला अनन्यसाधारण महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भद्रा मारुती मंदिर हे महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे स्थित आहे. हे भारतातील अत्यंत दुर्मिळ मंदिरांपैकी एक आहे. जेथे हनुमानजींची मूर्ती शयनमुद्रेत (झोपलेल्या अवस्थेत) आहे.

### मंदिराचे स्थान व महत्त्व

* **स्थान :** खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र
* **अंतर :** संभाजीनगरपासून सुमारे २८ किलोमीटरवर एलोरा लेण्यांपासून ४-५ किलोमीटरवर आहे.
* **देवता :** श्री हनुमानजी (भद्रा मारुती)
* **वैशिष्ट्य :** भारतातील फक्त २-३ मंदिरांपैकी एक, की जेथे हनुमानजींची मूर्ती शयनमुद्रेत/निद्रिस्त अवस्थेत आहे.

### पौराणिक कथा (भद्रा मारुतींची उत्पत्ती)

* **प्राचीन नाव :** भद्रावती नगरी
* प्राचीन काळी खुलताबादचे भद्रावती किंवा भद्रावती नगरी, असे नाव होते.

**राजा भद्रसेन :** रामभक्त शासक या नगरीवर भद्रसेन नावाचा एक धार्मिक आणि पवित्र राजा राज्य करीत असे. तो प्रभूश्रीरामचंद्रांचा अत्यंत प्रामाणिक भक्त होता. तो नित्यनेमाने भद्रकुंड (एक पवित्र तलाव)च्या काठी बसून प्रभू श्रीरामचंद्रांची भजने, स्तुती गीते गात असे.

### हनुमानजींचे आगमन व भावसमाधी

एक दिवस श्री हनुमानजी तेथून जात असताना त्यांना राजा भद्रसेनच्या प्रभू श्रीरामांच्या भजनाचे मधुर स्वर ऐकू आले. हनुमानजी त्या भजनाकडे आकर्षित होऊन तेथे आले. भजनाच्या मधुरतेने ते इतके मंत्रमुग्ध झाले की त्यांना कधी झोप (भावसमाधी) लागली, कळलेच नाही. हनुमानजी शयनमुद्रेत (झोपलेल्या अवस्थेत) ते भजन ऐकू लागले.

### राजाची विनंती व हनुमानाचा आशीर्वाद

जेव्हा भजन संपले तेव्हा हनुमानजी जागे झाले आणि राजाला म्हणाले, की बोल राजा, तुला काय वरदान पाहिजे? राजा भद्रसेन म्हणाला : 'प्रभू, तुम्ही येथेच कायमस्वरूपी निवास करावा आणि भक्तांना आशीर्वाद द्यावेत.' हनुमानजींनी 'तथास्तु' म्हटले आणि अंतर्धान पावले.

### शयनमुद्रेतील शिळा मूर्ती

ज्या ठिकाणी हनुमानजी झोपले होते तेथे शयनमुद्रेतील हनुमानजींची शिळा मूर्ती स्वतःहून प्रकट झाली. ही मूर्ती निद्रिस्त अवस्थेत असल्याने याला 'भद्रा मारुती' किंवा 'निद्रिस्त मारुती' असे म्हणतात. ही मूर्ती पाहण्यासाठी देशभरातून भक्त येतात.





### मंदिराची रचना व वैशिष्ट्ये

मंदिर लहान असले तरी अत्यंत पवित्र मानले जाते. मूर्ती जमिनीवर शयनमुद्रेत आहे, जी अत्यंत दुर्मिळ आहे. मंदिराजवळ भद्रकुंड तलाव आहे.

### भद्रकुंड तलावाचे महत्त्व

अशी मान्यता आहे, की जो भक्त भद्रकुंडच्या मातीने स्वतःला लेपन करून नंतर स्नान करतो त्याची सर्व पापे नष्ट होतात.

### दर्शनाचा योग्य वेळ व उत्सव

* दर मंगळवार आणि शनिवार भक्तांची मोठी गर्दी असते.
* हनुमान जयंती आणि रामनवमी या दिवशी लाखो भक्त दर्शनासाठी येतात.
* श्रावण महिन्यातील शनिवार विशेष महत्त्वाचा मानला जातो.

### मंदिराचे वेळापत्रक (अंदाजे)

* **सकाळ :** ५:०० ते १२:००
* **सायंकाळ :** ४:०० ते ९:००/१०:००

### कसे पोहोचावे?

* **औरंगाबादहून :** सुमारे २८ किमी (रोडने ४०-४५ मिनिटे)
* **एलोरा लेण्यांहून :** ४-५ किलोमीटर
* **शिर्डीहून :** १०७ किलोमीटर
* शनी शिंगणापूरहून १०२ किलोमीटर

### भक्तीभाव व नवस

भद्रा मारुती नवसाला पावणारा देव म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक भक्त संकटमोचन दर्शनासाठी येतात.

* **देवता :** श्री हनुमान (शयनमुद्रेत)
* **स्थान :** खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर
* **वैशिष्ट्य :** भारतातील दुर्मिळ शयनमुद्रेतील हनुमानजींची मूर्ती
* **पौराणिक कथा :** राजा भद्रसेन यांच्या प्रभू श्रीरामांच्या भजनावर हनुमानजी भावसमाधीत झोपले
* **विशेष दिवस :** मंगळवार, शनिवार, हनुमान जयंती, राम नवमी
* **जवळचे ठिकाण :** एलोरा लेणी (४-५ किलोमीटर)

### जय भद्रा मारुती

भक्तीभावाने दर्शन घेणाऱ्या भक्तांना महाबली हनुमानजींचे आशीर्वाद मिळतात, अशी श्रद्धा आहे.

### राजा भद्रसेन आणि भद्रकुंड तलावाचा इतिहास

**राजा भद्रसेन :** हा प्राचीन भद्रावती (सध्याचे खुलताबाद) येथील एक रामभक्त राजा होता. ज्याने भद्रकुंड नावाचा पवित्र तलाव बांधला होता.

**राजा भद्रसेन :** परिचय
नाव आणि काळ
**नाव :** भद्रसेन (काही ठिकाणी 'भद्रसेन राजा' किंवा 'राजर्षी भद्रसेन')
**काळ :** त्रेतायुग किंवा द्वापारयुग (पौराणिक कथेनुसार)
**राज्य :** भद्रावती नगरी (सध्याचे खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर)

### वैशिष्ट्ये

**रामाचा अत्यंत भक्त :** राजा भद्रसेन हा श्रीरामांचा निस्सीम भक्त होता.
**राजर्षी वृत्ती :** तो न्यायप्रिय, धार्मिक आणि विषय वैराग्य असलेला राजा होता.
**अहिंसावादी :** काही कथांनुसार तो युद्ध न करणारा आणि शेजारच्या राज्यांशी स्नेहपूर्ण संबंध ठेवणारा राजा होता.

### भद्रकुंड तलावाची निर्मिती

तलावाचे बांधकाम
राजा भद्रसेनाने श्रीरामांच्या मंदिरासाठी एक पवित्र तलाव बांधला. ज्याला त्याने 'भद्रकुंड' असे नाव दिले.
**उद्देश :** राजा रोज स्नान करून त्यानंतरच श्रीरामांची पूजा आणि भजन करीत असे.
**स्थान :** भद्रकुंड मंदिराजवळच आहे.

### तलावाचे धार्मिक महत्त्व

**पापनाशक :** अशी श्रद्धा आहे, की जो भक्त भद्रकुंडच्या मातीने स्वतःला लेपन करून नंतर स्नान करतो, त्याची सर्व पापे नष्ट होतात.
**विवाहासाठी वरदान :** अशीही मान्यता आहे, की भद्रकुंडात स्नान केल्यास चांगले जीवनसाथी मिळतात.
**पवित्र जल :** तलावाचे पाणी पवित्र मानले जाते आणि भक्त ते प्रसाद म्हणून घेतात.

### पौराणिक कथेतील भद्रसेन आणि भद्रकुंड

रोजची पूजा-अर्चा
राजा भद्रसेन नित्यनेमाने भद्रकुंडाच्या काठी बसून श्रीरामांची भजने, कीर्तन करीत असे. त्याचे रामधून इतके मधुर असे की चेतन आणि अचेतन सृष्टीही भावमय होत असे. तो रामाला 'भद्र' (पवित्र, शुद्ध) म्हणून पूजत असे.

### हनुमानजींचे आगमन

एक दिवस श्री हनुमानजी आकाशातून जात असताना त्यांना राजाच्या श्रीरामांच्या भजनाचे मधुर स्वर ऐकू आले. हनुमानजी त्या भजनाकडे आकर्षित होऊन भद्रकुंडाजवळ आले. भजनाच्या मधुरतेने ते इतके मंत्रमुग्ध झाले की त्यांना भावसमाधी (झोप) लागली. हनुमानजी शयनमुद्रेत ते भजन ऐकू लागले.

### राजाची विनंती

जेव्हा भजन संपले तेव्हा हनुमानजी जागे झाले आणि राजाला वरदान मागण्यास सांगितले.
**राजा भद्रसेन म्हणाला :** प्रभू, तुम्ही येथेच कायमस्वरूपी निवास करावा आणि भक्तांना आशीर्वाद द्यावेत. हनुमानांनी 'तथास्तु' म्हटले आणि अंतर्धान पावले.

### भद्रावती ते खुलताबाद नावाचा इतिहास

**प्राचीन नावे**
**भद्रावती :** राजा भद्रसेनच्या काळात या शहराला भद्रावती असे नाव होते.
**रत्नापूर/रत्नगिरी :** मध्ययुगात याला रत्नापूर किंवा रत्नगिरी असेही म्हणत.
**खुलताबाद नाव कसे पडले?**
**मुघल काळ :** औरंगजेबाने दख्खनमध्ये आल्यावर या भागावर मुघल सत्ता प्रस्थापित केली.
**खुलताबाद :** औरंगजेबाने रत्नगिरीचे नाव खुलताबाद केले.
खुलत = स्वर्ग (फारसी भाषेत)
खुलताबाद = स्वर्गाचे शहर

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**